<u>नि. दिवाणी दावा क्र.४१०/२०१५</u>

<u>निवृत्ती व इतर वि. रेणुबाई</u>

<u>नि.क्र.११५</u>

<u>वादींतर्फे शपथेवर अतिरिक्त सरतपास विधीज्ञ श्री.एच. एम. पठाण यांच्या मार्फत सुरु</u>

मी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर बरोबर आहे. ते शपथपत्र **नि.क्र.११५** वर आहे. मी दावा दाखल करते वेळेस दोन ७/१२ उतारे दाखल केले आहे, ते नि.क्र.११६ व ११७ वर आहे. तसेच मी नि.क्र.११४ सोबत नि.दि.दावा क्र.२००/२००७ दाव्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे, ती प्रत **नि.क्र.११६** वर आहे. तसेच मी नि.दि.दावा क्र.१८५/२००७ मधील न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे, ती प्रत **नि.क्र.११७** वर आहे. तसेच मी नि.दि.दावा क्र.१८५/२००७ मधील हुकुमनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केली असुन, ती प्रत **नि.क्र.११८** वर आहे. मी आसराबाई सखाराम गाढे यांनी नि.दि.दावा क्र.१८५/२००७ मध्ये दाखल केलेल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राची प्रमाणित प्रत देखील अभिलेखावर दाखल केली आहे, ती प्रत **नि.क्र.११९** वर आहे.

**वादींच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित अतिरिक्त सरतपास पुढील तारखेपर्यंत शेवटची संधी म्हणुन तहकुब ठेवण्यात येतो. यावेळी वादींच्या विधिज्ञांना जर पुढील तारखेपर्यंत अतिरिक्त सरतपास पुर्ण झाला नाही, तर उर्वरित अतिरिक्त सरतपास न नोंदविता प्रकरण उलटतपासासाठी ठेवण्यात येईल, याची सुचना देण्यात आली.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AYYUB BABU SHAIKH
Date: 2025.07.07 10:30:20 +0530

**( ए. बी. शेख )**

दिनांक– ०५.०७.२०२५.

२रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वैजापूर.